REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017

# भारतीय राजकीय व्यवस्थेत महिलांची भूमिका

**डॉ. मारूती घंटेवाड**
**प्राध्यापक, वसुंधरा कला महाविदयालय, जुळे सोलापूर.**

## प्रस्तावना

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय राजकीय व्यवस्थेत लोकशाही तत्वानूसार निवडणुकीच्या माध्यमातून कायदयाचे कल्यानकारी जनतेचे राज्य आस्तीत्वात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय जनतेला समर्पीत केलेल्या राज्यघटनेतून स्त्री - पुरुष समान कायदा करुन पुरुषांच्या बरोबरीने महिलांना आधिकार बहाल केले. त्यास प्रतिसाद म्हणून महिलांनी पुरुषाबरोबर आपल्या कार्याचा घटनेनी दिलेल्या अधिकाराचा कायदयानुसार वापर करीत ठसा उमटवीला आहे. महिलांना समानतेचा हक्क प्राप्त झाल्यामूळे महिला शिक्षण क्षेत्रात प्रथम क्रमांक घेतांना दिसतात असे कोणतेही क्षेत्र आज राहीलेले नाही की, ज्या क्षेत्रात महिलांचा सहभाग नाही उलट महिला पुरुषांपेक्षा उतकृष्ट कामगीरी करताना दिसून येतात. ज्या घराण्यात कुंटूबात महिला सुरक्षित आहेत त्या कुटूंबाचा विकास गतीने होत आहे. आज महिलांना शिक्षणात, नौकरी, व्यावसात, राजकारणात सहभाग घेण्याचा, संशोधन करण्याचा, देशाचे संरक्षण करण्याचा, शासन निवण्याचा, समाजसेवा करण्याचा, क्रिडाक्षेत्रात, संगितात, नाटक, चीत्रपटात काम करण्याचा आधिकार कायदयानुसार मिळाला असल्यामूळे आज महीला, शिक्षक, जिल्हातील पोलीस क्षेत्रात, रेल्वे, विमानसेवा, परराष्ट्रसेवा आमदार, खासदार, पंतप्रधान, राष्ट्रपती, आंतराळवीर, क्रिकेटपटू, टेनीपटटू, कबड्डी , खोखो कुसत्यांनमध्येही




मागे राहिलेली नाही कारण प्रत्येकांना आपल्या विचाराप्रमाणे आवडीनुसार कोणत्याही क्षेत्रात प्रगती करण्याचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आलेले आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता प्रत्येक क्षेत्रात पुरुषाबरोबर महिलांना समान अधिकार प्राप्त झाले आहेत.

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधनाची अमलबजावनी झाली. भारत देश सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रधान देश म्हणून जगानी मान्य केल. भारतीय महिलांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ज्या प्रकारे सहभाग घेतला महात्मा गांधीजीनी स्त्री शक्तीचे महत्व ओळखूनच स्वातंत्र्य अंदोलनात स्त्रीयांना सहभागी करुन घेतले होते. हे जरी खरे असले तरी स्वातंत्र्यापूर्वी भारतात मनुवादयांनी चालवीत आनलेल्या रुठी, प्रथा, परंपरा यामूळे भारतीय स्त्री पुरुषांच्या अधीन राहिलेली दिसते. ज्या कुंटूंबात उदारवादी विचाराचे प्रवाह निर्माण झाले त्या कुटूंबातील महिलांना स्वातंत्र्य ,समतेचा, अधिकार मिळाला तरीही त्या महीला प्रथम समोर आलेल्या दिसत नाहीत. डोक्यावरील साडीचा पदर खाली पडू देत नसत .अर्थात पुरुषांचे वर्चस्व कायम पूरुषांनी ठेवताना दिसून येते. त्यामुळे आधिकांरांचा घटनात्मक स्वातंत्र्याचा स्त्रीयांना - पुरुषांप्रमानेच मतदानाचा अधिकार मिळाला. मात्र इंग्लड मधील महीलांना मतदानाच्या आधिकारासाठी संघर्ष करावा लागला असे अधिकार भारतीय महिलांना संविधानाने दिले असले तरी भारतीय स्त्रीया राजकारणात सहभागी होवू शकल्या नाहीत. कारण परंपरंने चालत आलेली बंधने समाजाचा स्त्रीयांनकडे पाहण्याचा दृष्टीकोन चुल आणि मूल हेच स्त्रीयांच विश्व अशी झालेली समज या सर्व गोष्टी कारणीभूत होत्या. स्त्रीयांचे स्वातंत्र्य मर्यादित स्वरुपात होते .आवडी निवडीचे स्वातंत्र्य दिले जात नव्हते. पतीच्या विरोधात निर्णय घेण्याचा अधिकार नाकारलेला होता. मतदानाचा हक्क सुध्दा पतीच्या इच्छेनुसार बजावत असत.स्त्री स्वावलंबी नसुन परावलंबी होती. वडील, पती नंतर मुलगा यांच्या नियंत्रनातच त्याचे जिवतं संपत असे. परंतू काळ परीस्थीतीनुसार अमुलाग्र बदल झाला.

भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाचा विकास करण्यासाठी प्रत्येक स्त्री - पुरुषांना प्रतेक क्षेत्रात कार्य करावे यासाठी प्रत्येकांना स्वातंत्र्याला, काम करण्याचा, बोलण्याचा, लिहण्याचा, भाषणमुद्रण करण्याचा, राजकारणात सहभागी होण्याचा, स्वतच्या विचारानुसार आपल्या आवडीच्या लोकप्रतीनीधीची निवड करण्याचा , विरोध करण्याचा, दबावतंत्र निर्माण

करण्याचा, पक्ष स्थापन करण्याचा आधिकार प्राप्त झाला तरीही स्त्रीयांचा सहभाग भारतीय राजकारणात दिसत नव्हता कारण प्रत्येकास असे वाटायचे की, दुसऱ्यांच्या घरात सावित्रीचा जन्म व्हावा माझ्या घरात नव्हे अशी कर्मष्ठ पुरुषांची विचारसरणी होती. भारतात स्थानिक स्वाराज्य संस्था निर्माण करण्यात आल्या होत्या भारतीय संसद आणि राज्य मंत्रीमंडळात महिलांचा राजकीय सहभाग अत्यल्प होता त्याची आकडेवारी वर्षानिहाय खालील तक्यातून दिसून येते.

**लोकसभेत महिलांचा सहभाग**

| लोकसंख्या | एकूण सदस्य | महिलांची संख्या |
|---|---|---|
| १९५२ | ४८९ | २२ |
| १९५७ | ४९४ | २७ |
| १९६२ | ४९४ | ३४ |
| १९४७ | ५२३ | ३२ |
| १९७१ | ५२१ | २२ |
| १९७७ | ५४४ | १९ |
| १९८० | ५४४ | २८ |
| १९८४ | ५४४ | ४४ |
| १९८९ | ५२९ | २८ |
| १९९१ | ५०९ | ३६ |
| १९९६ | ५४१ | ४० |
| १९९८ | ५४५ | ४४ |
| १९९९ | ५४३ | ४८ |
| २००४ | ५४३ | ४५ |
| २००९ | ५४३ | ५९ |
| २०१४ | ५४३ | ६१ |

भारीतीय लोकसभेतील महीला प्रतिनीधीची संख्या पाहिली तर वरील आकडेवारीनुसार अत्याल्प दिसून येते परंतु या संख्येमध्ये मात्र बदल होत राहीला महीला प्रतिनीधीच्या संख्यात सातत्याने वाढ होत राहीली त्यांचे नेतृत्वही पुरुष मंडळीनी मान्य केल्याचेच दिसून येते. १९५२ साली ४८९ संख्यापैकी महीलांची संख्या ६२ होती तर २०१४ साली ५४३ सदस्यापैकी महीलांची संख्या ६१ वर पोहोचली अर्थात महीलांचा राजकीय व्यवस्थेतील सहभागाचा चढता आलेखच म्हणावा लागतो. त्याचे महत्वाचे दुसरे कारण म्हणजे. महीला राजकारणात खालीलप्रमाणे सहभागी व्हाव्यात हया हेतूने बळंवतराव मेहता समितीच्या शिफारशीनुसार स्त्रीयांना स्थानिक राजकारणात प्रवेशाची संधी प्राप्त झाली. १९५० पासून ते आजपर्यत भारतीय राज्यघटनेत आनेक वेळा दुरुसत्या करण्यात आल्या परंतू १९९२ साली करण्यात आलेली ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती विशेष लक्ष वेधुन घेणारी आहे. आनेकांनी तर या घटनादुरुस्तीस दुसरे स्वातंत्र्य म्हणुन संबोधले आहे ही घटनादुरुस्ती १९९३ पासून आमलात आली.

भारतीय नागरींकाचा विकास करण्यासाठी ग्रामीण भागातील नागरीकांचा विकास होणे महत्वाचे आहे. तसेच सत्तेचे विकेंद्रीकरण करणे महत्वाचे आहे. जोपर्यंत गावातील सरपंचाला जादा आधिकार मिळणार नाहीत तोपर्यत खेडयापाडयांचा विकास होणार नाही .त्याचबरोबर स्थानिक स्वाराज्य संस्थेत महीलांचा राजकीय सहभाग होणार नाही तोपर्यत ग्रामीण भागाचा पर्यायाने देशाचा विकास होणार नाही .याची जाणी व राज्कत्यांना झ ाली म्हणून ग्रामीण भागात सत्तचे विकेद्रींकरण करण्यासाठी पंचायत राज्यव्यवस्थेला घटनात्मक दर्जा देण्यासाठी तत्कालीन भारतीय पंतप्रधान पी.व्ही. नरशिंहराव सरकारने २२ डिसंबर १९९२ रोजी लोकसभेत पंचायतराज विधेयक मांडले. लोकसभेने या विघेयकास मान्यता दिली. २० एप्रील १९९३ रोजी राष्ट्रपतीच्या सहमतीनंतर पहिल्यांदा पंचायतराज व्यवस्थेस घटनात्मक दर्जा मिळाला. त्याचबरोबर ७४ व्या घटनादुरुस्तीने नागरी स्थानिक स्वाराज्य संस्थाच्या कारभारात क्रांतीकारक बदल घडवून आणला आहे. स्थानिक स्वाराज्य संस्थांचे एकंदर आवलोकन केल्यास असे दिसुन येते की, नागरी स्वानिक स्वराज्य संस्थांचे आस्तित्व त्यांना मिळणारी अनुदाने व त्यांच्या होणाऱ्या निवडणुका हया राज्सरकारच्या मर्जीवरच

आवलंबुन होत्या. ७४ व्या घटना दुरुस्तीने नागरी स्थानीक स्वाराज्य संस्थाना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. यासाठी स्वतंत्र राज्य वित्त आयोगाची स्थापनाही करण्यात आली कारण यांच्या निवडणुका वेळेवर स्वतंत्रपणे निपक्षपाती वातावरणात घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापनाही करण्यात आली. त्यामूळे देशातील सर्व स्थानिक स्वराज्य स्थांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले ते महीलांच्या राजकीय सहभागाचे प्रवेशद्वार ठरले असेच म्हणावे लागते. २०११ साली महाराष्ट्रात राज्य सरकारणे स्थानिक स्वाराज्य संस्थेत महिलांसाठी ५० टक्के राजकारणात सहभागी करुन घेण्यासाठी संधी प्राप्त झाली परंतु राजकारणात सहभागी झालेल्या महिला हया एक तर राजकीय घराणेशाही संबंधातील दिसतात दुसरे असे की ज्यांचे संबंध राजकारण्यासी आहेत अशाच महिला राजकारण सहभागी झालेल्या दिसत होत्या. परंतु २०१४ नंतर मात्र सुशिक्षित असणाऱ्या महिलांसुध्दा राजकारणातील भष्टाचार, गुंडगीरी नष्ट करण्यासाठी राजकाराणात सक्रीय होतांना दिसून येतात. भारतीय राजकीय व्यवस्थेतील स्त्रीयांचा सहभाग आणि त्यांची राजकारणातील उदासीनता दिसते. प्राथमिक अवस्थेत लोकसंख्याच ३ टक्के असल्यामूळे स्त्रीची भूमिका राजकारणातील प्रभावी नव्हती परंतु स्त्रीयांचा सहभाग जरी संख्यांने कमी असला तरी त्यांचे नेतृत्व पुरुषापेक्षा प्रभावी दिसून येते



विजयालक्ष्मी पंडीत, श्रीमती इंदिरा गांधी यांचे आपणास उत्तम प्रभावी पणे नेतृत्व कृतृत्व आणि देशाविषयीची भुमिका आपल्याला प्रभावशालीच दिसुन येते.



स्त्रीयांच्या राजकारणातील भुमिकेचे अध्ययन केल्यास एक गोष्ट महत्वाची दिसते की, सक्षम, सबल आणि कार्यक्षम महिला पुरुषाच्या बरोबरीने राजकीय भूमिका पार पाडू शकतात निर्णय निर्धारण आणि अमलबजावणीत स्त्रीया कोठे ही कमी पडत नाहीत म्हणुन तर श्रीमती इंदिरा गांधी भारतीय जनतेच्या विशेषत महिलांच्या गळयातील ताईत बनली. स्त्री ही भारतीय राजकारणातील राष्ट्रपती



पंतप्रधान, लोकसभा सभापती, कॅबीनेट मंत्री, मुख्यमंत्री राज्यपाल या कोण्त्याही पदावर कार्यक्षमपणाने काम करु शकते हे भारतीय स्त्रीयां नी आपल्या कर्तृत्वाद्वारे दाखवून दिले आहे. विविध घटक राज्यातील मुख्यमंत्री पदे ही कार्यक्षम पध्दतीने सांभाळत आहेत.



उलट स्त्रीया राजकारणात निर्भिडपणे जनतेच्याहितासाठी भष्टाचाराला थारा न देता सर्वसामान्य पर्यत न्याय समता संधी मिळवून देण्यासाठी कार्य करीत असतांना पुरुष प्रधान राजकारणी त्यांची सत्ता नष्ट करण्याच्या मार्गावर असतात कारण स्त्रीचे नेतृत्व कर्मष्ठ भष्टाचारी, फॅसिस्टवादी विचाराच्या पुरुषांना मान्य नसते आज श्रीमती इंदिरा गांधी ची हत्या करण्यात आली जयललीता यांचा मृत्य संशयास्पद दिसतो. शिला दिक्षित यांचा दिर्घकालीन सत्तेला धक्का दिला. ममता बॅनर्जीच्या विरोधात भाजप जाऊन वाटेल त्या मार्गाने सत्ता संपूष्टात आणण्याचा प्रयत्न करीत आहे त्या कोणत्याही विरोधी राजकीय डावपेचाला न जुमानता आपली एक हाती सत्त कायम ठेवण्यात आपल्या कर्तृत्वाच्या क्षमतेवर यसस्वी होत आहेत. त्याचबरोबर सष्मा स्वराज सारख्या प्रभावशाली राजकीय स्त्रीचे नेतृत्व मान्य करण्यास भाजप मंडळी तयार नाहीत. गुजरातमध्ये श्रीमती आनंदीबेन पटेल यांना मुख्यमंत्री पद दिले खरे परंतु तात्काळ गुजरातमधील निवडणुकीच्या बहाण्यावरुन पद काढून पुरुषाकडे सुपूर्त केले. सध्यातरी भारताच्या २९ राज्याचा विचार केल्यास जम्मू काश्मीर पश्चिम बंगाल, राज्यस्थान मध्ये सध्या महिला मुख्यमंत्री म्हणून महत्वाची भुमिका बजावत आहेतत्र मध्यप्रदेश मध्ये उमा भरती मुख्यमंत्री पद कार्यक्षमपणाणे सांभाळले आहेत अर्थात वसुंधरा राजे, ममता बॅनर्जी, उमा भारती, महबुदा मुक्ती, आनंदीबेन पटेल, मायावती, जयललीता, शिला दिक्षित , राबडी देवी आसाम- सईदा अनवरा तैमूर, गोवा -शशीकला कामादेकर, ओरीसा- नंदीनी

सत्पथीनी मुख्यमंत्री पदी कार्य उतकृष्ठपणे केले आहे. आजपर्यत १४ महीला भारतीय राजकारणाच्या व्यवस्थेत महत्वाीच भूमिका बजावलेली आहेत त्याच बरोबर राज्यपालपदेही महीलांनी स्विकारले व सांभाळलेली प्रथम १९६३ मध्ये उत्तर प्रदेशच्या राज्यपाल पहिली महीला म्हणून सरोजी नायडू शपत घेतली. गुजरात व अंधप्रदेश -शारदा मुखर्जी, हिमाचल प्रदेश- शीला कौल ,केरळ - ज्योती व्यंकटचलम, मध्यप्रदेश -सरला ग्रेवाल, महाराष्ट्र - विजयालक्ष्मी पंडीत ,राज्यस्थान- प्रतिभा पाटील,तामीळनाडू - फतिमा बिबी, पंशिचम बंगाल - पदमाजा नायडू, झारखंड - प्रोपदी मुर्भ इत्यादीनी राज्यपाल पदे सांभाळली एवढेच नसुन लोकसभा सभापती मिरा कूमारी नायर,



सध्या सुमीत्रा महाजन कार्यरत आहेत. आज भारतीय राजकारणात महीलांची भूमिका अतिशय महत्वाची आहे. कारण अलीकडे महीलाबरील लहान बालीकांवरील अत्याचार बालात्काराचे प्रमाण वाढले आहे. जर महीला राजकीय सत्तेच्या प्रवाहात राहील्यास बलात्कारी नाराधमाना लवकरात लवकर फासावर लटकवतील त्या ठिकानी पक्ष किंवा नेता पहानार नाहीत फक्त महीलांना न्याय देण्याचा प्रयत्न करतीतल. त्याच बरोबर पंचयायतराज व्यवस्थेत महलांना ३३ टक्के आरक्षीत जागा दिल्यामूळे आज महिला महापैार, जिल्हा परीषदेच्या अध्यक्ष, पंचाय समीतीच्या सभापती, गावच्या सरपंच दिसत आहेत. महिलांचा राजकीय क्षेत्रात सहभाग आधिक झाल्यास गुणात्मक कार्यात्मक राजकारण दिसेल लोकशाहीच्या आस्ताला रोकण्याचे, भष्टाचार निर्मुलणाचे गुन्हेगारीचे राजकारण नष्ट करण्याचे कार्य महीलाच करु शकतात हे त्यांच्या कार्यावरुन दिसुन येते.

## सारांश

भारतातल गुन्हेगारी प्रवृतीस आळा बसविने , महिलांनवरील आत्याचार बलात्कारा सारख्या घडणाऱ्या घटनांवर कडक शिक्षा सुनावने, भष्टाचार नष्ट करणे, काल्यानकारी राज्याची संकल्पना आमलात आणणे, लालफीतशाही, नष्ट करणे एकतर्फी घेणाच्या निर्णयास विरोध करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, लींग-भेद समाप्त करणे, धार्मिक समता प्रस्तापीत करणे, जातीय व्यवस्था नष्ट करणे, सामाजिक भेद - भावनष्ट करणे .प्रत्येकास काम करण्याची संधी उपलब्ध करुन देणे, महीलांनीच महीला संघटन मजबून करण्यासाठी गलीपासून (सरपंच पदापासून) दिल्लीपर्यत, राष्ट्रपती पदापर्यत महीला महिलांना राजकीय क्षेत्रात वर्ग, जात, धर्म, पंथ, विसुरुन मी एक भारतीय स्त्री आहे स्त्रीला सहकार्य करणे स्त्रीचा प्रथम धर्म आहे या हेतूने मदतीचा हात पुढे केल्यास भारतीय राजकीय व्यवस्थेत अमुलाग्र बदल होतील तेही पुरुषांच्या बरोबर स्त्रीयांचे प्रमाण राज्य व राष्ट्रीय पातळीवर बरोबरीचे झले तरच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा विकास होईल त्याच बरोबर भारताचा आर्थिक दृष्टीकोनातून विकास होण्यास सर्वांचाच हातभार असेल. याचे श्रेय सर्व भारतीय जनतेलाच मिळले.

## संदर्भसुची


१. Vasant wagh, Proceeding Book, Educlity, Liberty & Ground Realities in indian Context, Success Publication, Pune २९ December २०१६
२. महिपाल, पंचायती राज, चुनैतिया एंव संभावनाएं, नेशनल बुक ट्रस्ट , इंडिया, नई दिल्ली, २०११

३. जी.एस. बढे, भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था, उगम आणि विकास १९७८
४. जैन व फाडीया, भारत की शासन एवं राजनिति, साहित्य भवन आगरा , २००२
५. मोहीनी कडू, भारतीय राजकारण, दशा आणि दिशा, विजय प्रकाशन, नागपूर, २००६
६. टी.एन गायकवाड, महाराष्ट्रातील स्थानिक स्वशासन स्वप्नाली प्रकाशन अहमदपूर, २००९